प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः मासका २०१७/प्र.क्र.४९३ /कु.क.
नवीन मंत्रालय, १० वा मजला, गो.ते.रुग्णालय, संकुल इमारत,
लो.टि.मार्ग, मुंबई-४०० ००१
तारीख: ४ जानेवारी, २०१८.

वाचा :-

१) **शासन निर्णय :** सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : मासका २०१७/प्र.क्र.४९३ /कु.क., दि.८/१२/२०१७.

शासन शुध्दीपत्रक :-

शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक ८.१२.२०१७ अन्वये, प्रधानमंत्री मातृवंदना ही योजना राज्यात लागू करण्यात आली आहे. अंमलबजावणीच्या सदरहू शासन निर्णय, दिनांक ८.१२.२०१७ मधील पुढील तरतुदी खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत:-

अ) सदरहू शासन निर्णय, दि.८.१२.२०१७ च्या परिच्छेद ४ (४) मध्ये नमूद केल्यानुसार, "नैसर्गिक गर्भपात झाल्यास किंवा मृत बालक जन्मल्यास त्या टप्प्यापुरताच लाभ एकदाच अनुज्ञेय राहील."

या पुढे

"तसेच पुढील गर्भधारणेत पात्रतेच्या निकषानुसार अनुज्ञेय उर्वरित टप्प्याचे लाभ देय राहतील" ही अधिकची तरतुद अंतर्भूत करण्यात यावी.

ब) उक्त शासन निर्णय, दि.८.१२.२०१७ च्या परिच्छेद ५ मधील तक्त्यातील अनुक्रमांक ३ च्या लाभाचे निकष यामध्ये

"बालकास बीसीजी, ओपीव्ही, डीपीटी आणि हिपॅटॅटीस बी त्या अनुषंगिक लसीकरणाचा पहिला खुराक दिल्यानंतर तिसरा हप्ता लाभार्थीच्या खात्यात जमा केला जाईल."

या ऐवजी

"बालकाचे प्राथमिक लसीकरणाचा जन्मत: एक मात्रा बीसीजी, ओपीव्ही, हिपॅटॅटीस बी तसेच पेन्टाव्हॅलेन्ट चे ३ व ओपीव्ही च्या ३ मात्रा अथवा समतुल्य लसीकरण पूर्ण झाल्यावर" असे वाचण्यात यावे.

क) उक्त शासन निर्णय, दि.८.१२.२०१७ च्या परिच्छेद ५ मधील तक्त्याखालील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे,

"लाभार्थी महिलेची शासकीय रुग्णालयात प्रसुती झाल्यास तिला जननी सुरक्षा योजने अंतर्गत रु.७००/- (ग्रामीण भागात) व रु.६००/- (शहरी भागात) लाभ अनुज्ञेय राहील".

<u>**या ऐवजी**</u>

"प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या लाभा व्यतिरिक्त पात्रतेच्या निकषानुसार लाभार्थी महिलेस जननी सुरक्षा योजनेचा लाभही अनुज्ञेय राहील". असे वाचण्यात यावे.

सदरहू शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०४१४४१३६९४१७ असा आहे. सदरचे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.01.04 16:17:23 +05'30'

(वर्षा मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
२. मा.मंत्री (साआवि), मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री,/वित्त/नियोजन), मंत्रालय,मुंबई
४. मा.मंत्री (आदिवासी विकास विभाग), मंत्रालय,मुंबई
५. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग), मंत्रालय,मुंबई
६. मा.राज्यमंत्री,(साआवि), मंत्रालय,मुंबई
७. मा.अमुस (वित्त विभाग), मंत्रालय,मुंबई.
८. मा.प्रधान सचिव (साआवि), मंत्रालय, मुंबई
९. मा.प्रधान सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई
१०. मा.प्रधान सचिव (आ.वि.वि.), मंत्रालय, मुंबई
११. मा.प्रधान सचिव (म. व बा.वि.वि.), मंत्रालय, मुंबई
१२. मा.प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग), मंत्रालय, मुंबई

१३. महालेखापाल,महाराष्ट्र -१/२ (लेखापरीक्षा/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१४. अधिदान व लेखा कोषागार, मुंबई.
१५. आयुक्त आरोग्य सेवा, तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१७. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे
१८. निवासी लेखाधिकारी, मुंबई
१९. सचिव,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, निर्माण भवन,नवी, दिल्ली
२०. विभागीय संचालक (कु.क.), ८२/२, पर्वती, पहिला माळा, दर्पण बिल्डींग, सहकार नगर, पुणे
२१. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२२. सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२३. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)
२४. जिल्हा शल्य चिकित्सक , सामान्य रूग्णालय (सर्व)
२५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२६. वित्त विभाग (व्यय-१३) मंत्रालय, मुंबई
२७. निवडनस्ती (कु.क.).